जागतिक बँक अर्थसहाय्यीत

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प

सहकार व पणन विभाग, महाराष्ट्र शासन

प्रकल्प समन्वय कार्यालय

प्लॅट नं. एफ/ई/७८, पहिला मजला, भु -विकास बॅंकेचे प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७

दूरध्वनी ०२०-२४२७०३१५/१६, फॅक्स ०२०-२४२७०३२२, ई-मेल- macp2009@ymail.com

जा.क्रं. एम.ए.सी.पी/पीसीयु/ESC/ESMF/७४९ /२०११ दि. ३०/७/२०११

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पशुसंवर्धन) करिता पर्यावरण व्यवस्थापन बाबत मार्गदर्शक सूचना

पशुपालन संबंधीत वाढते औद्योगिक घटक, चा-याच्या उपलब्धतेमध्ये होणारी घट, हवामानामध्ये होत असलेल्या बदलांबाबत जनावरांचे साधर्म्य इ. पर्यावरणावर होत असलेले परिणाम आहेत. त्यामुळे प्रकल्प- ESMF मध्ये पशुपालनाकरिता 'एकात्मिक किडरोग व्यवस्थापन' (IPM) आराखडा विकसित करण्यात आलेला आहे. प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA), पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) www.msamb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रकल्पात नुतनीकरणाकरीता निवड झालेल्या एका जनावरांच्या बाजारपेठेमध्ये प्रकल्प समन्वय कक्षातर्फे जनावरांची बाजारपेठ, पशुपालन व त्यामुळे पर्यावरणावर होणा-या परिणामांचा स्वतंत्र अभ्यास देखील करण्यात आला.

वरील अहवालांच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणीमध्ये खालील ठळक बाबींचा अंतर्भाव करणे जरुरी आहे.

i. पशुसंवर्धनकरिता ATMA अंर्तगत होणार असणा-या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये एकात्मिक कीडरोगव्यवस्थापन (Pest Surveillance) बाबत अंतर्भाव करण्यात यावा.

ii. बाजारपेठेत व प्रकल्पाच्या अंतर्गत येणा-या भागातील जनावरांचे स्वास्थ व आरोग्याबाबत पशुपालकांमध्ये जागरूकता निर्माण करावी व त्याची खात्री करावी.

iii. पशुपालकांना चारा व शेणखत (manure) च्या परिणामकारक व्यवस्थापनाबाबत जागरूक करावे व प्रोत्साहन द्यावे. जनावरांच्या विष्ठेची (manure) साठवणूक घन (वाळलेल्या) अवस्थेत करावी जेणेकरून वैश्विक तापमान वाढीस (Global Warming) कारणीभूत असलेल्या हरितगृह वायू (Green House Gases) मधील मिथेन (methane) या हानीकारक वायूचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.

iv. शेतक-यांना/पशुपालकांना पशुच्या खाद्यांमध्ये मका आणि सोया न देता अल्फा अल्फा व जवस यांचा अंतर्भाव करण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे जनावरांच्या अन्न पचन क्रियेवर ताण येणार नाही व ढेकरचे प्रमाण कमी होईल. जेणेकरून ढेकर मधून मिथेन वायू बाहेर पडतो त्यास रोखण्यास मदत होईल.

v. शेतक-यांना सामुदायिक तत्वावर घनकचरा व्यवस्थापनाकरिता बायोगॅस सयंत्र उभारण्यास प्रोत्साहन द्यावे व त्याचे महत्व सांगावे. बायोगॅस सयंत्रामुळे हे शेतकरी उर्जानिर्मितीबाबत स्वयंपूर्ण होतील. याच बरोबर त्यांना या संयंत्रामधून उत्कृष्ट दर्जाचे खत देखील मिळेल. या खतामध्ये किटक नसतात व ते जमिनीची पोत आणि मातीचा कस वाढविण्याच्या दृष्टीने उपयोगी आहे.

vi. पशूधनाला आरोग्यदायी वातावरणात ठेवणे.

vii. किटकनाशकांचा सुरक्षित उपयोग व त्याच्या रिकाम्या झालेल्या भांड्यांची सुरक्षित विल्हेवाट लावणे तसेच निर्बंध आलेल्या किटकनाशकांबाबत जागृती करणे.

viii. जनावरांचे स्वास्थ्य शिबिरे तसेच लसीकरण इ. दरम्यान निर्माण होणाऱ्या Bio-Medical Waste चे व्यवस्थापन शासकीय निर्देशाप्रमाणे करावे.

# पशुसंवर्धन विभागाकरिता सामाजिक व्यवस्थापन विषयक मार्गदर्शक सूचना

**१. प्रकल्प अंमलबजावणी व सामाजिक समायोजन:**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, पशुसंवर्धन यांच्या वतीने निवडक जिल्ह्यांमध्ये हाती घ्यावयाच्या उपक्रमांमध्ये संबंधित क्षेत्रातील महिला, आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती व अन्य दुर्बल घटकांचा समावेश व्हावा या दृष्टीने विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.

प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA) यामध्ये पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा दिलेला असुन उपप्रकल्प कार्यक्षेत्रातील अन्य समाज घटकांचे बरोबरीने वर उल्लेख केलेल्या घटकांचा समावेश पशुसंवर्धन विषयक सेवा- सुविधांमध्ये होणे आवश्यक आहे. तसेच या समाज घटकांचा समावेश प्रकल्पाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत म्हणजेच प्रकल्प पूर्वतयारी, प्रकल्प अंमलबजावणी व प्रकल्प कार्यान्वयन या सर्व टप्प्यांमध्ये होण्याबाबतची दक्षता घेऊन तसा अहवाल प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- पशुसंवर्धन, पुणे यांना वेळोवेळी सादर करणे बंधनकारक आहे.

पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापनविषयक अधिक माहितीसाठी अधिकाऱ्यांनी प्रकल्प अंमलबजावणी पुस्तिका (PIP) व त्याची परिशिष्टे, एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA), लोकांसाठी प्रकल्प कार्यवाही मार्गदर्शिका (COM), पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन मार्गदर्शिका व अन्य उपलब्ध मार्गर्शक पुस्तिकांचा वापर करावा. प्रकल्पाशी संबंधित महत्वपूर्ण माहिती www.macp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल.

**२. सामाजिक समायोजन विषयक बाबी:**

पर्यावरण व सामाजिक मुल्यांकन अहवालातील प्रकल्प अंमलबजावणीमध्ये सामाजिक समायोजनविषयक महत्वपूर्ण उपाययोजना सुचविल्या असून त्या खालीलप्रमाणे.

- प्रकल्पांतील कामांमुळे लोकांचे विस्थापन किंवा त्यांचे पुनर्वसन अपेक्षित नाही. तरीदेखील एखादे काम हाती घेताना असा मुद्दा उपस्थित झालाच तर करावयाची उपाययोजना.
- स्थानिक लोकांना विषेशत: महिला, आदिवासी, अनुसूचित जाती- जमाती व अन्य दूर्बल घटकांना या प्रकल्पाचे लाभ मिळावेत तसेच बाजारपेठांमधील विविध सुविधांमध्ये या घटकांचा समावेश व्हावा म्हणून उपाययोजना.
- पुरूषांच्या बरोबरीने महिलांचा विकास व्हावा या दृष्टीने सुचविलेली उपाययोजना.

**३. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व घ्यावयाची दक्षता:**

- पशुसंवर्धन विषयक उपक्रमांचे लाभार्थी निवडतांना आदिवासी, अनुसूचित जाती- जमाती व अन्य दुर्बल घटकातील कुटूंबांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्राधान्याने समाविष्ट करुन घेतले जाईल याची दक्षता घ्यावी.
- प्रकल्पांतर्गत काम करणारे संलग्न शासन विभागाचे कर्मचारी, अंमलबजावणी संस्था व वैयक्तिक लाभार्थी या सर्वांची प्रकल्पाच्या यशस्वितेमध्ये महत्वाची भूमिका आहे. पशुसंवर्धनविषयक उपप्रकल्पामध्ये पशुपालकांचे गट व फेडरेशन निर्मिती, शेळीपालन पथदर्शी प्रयोग, चांगल्या शेळ्यांच्या पैदासीसाठी जातीवंत बोकडांचा पशुपालक गटांमार्फत पुरवठा इ. उपक्रमांशिवाय पशुपालनासंदर्भात विस्तार सेवा, नविन माहिती तंत्रज्ञान प्रदान करणे यासारखे नाविण्यपूर्ण उपक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या सर्व उपक्रमांमध्ये या विहीत समाज घटकांचा प्राधान्याने समावेश होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आवश्यक कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येवून योग्य ती दक्षता घेण्यात यावी. या घटकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी करुन घ्यावे.
- पशुसंवर्धन विषयक उपप्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित शेतकरी, पशुपालक यांच्यासाठी आयोजित करावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, अभ्यासदौरे इ. कार्यक्रमांमध्ये या समाज घटकांचा समावेश होईल व त्यांना प्रत्यक्ष लाभ होईल याची दक्षता अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रकल्पांतर्गत क्षमताबांधणीविषयक दिलेल्या आराखड्यानुसार काम करणे आवश्यक आहे.

- पशुसंवर्धन विषयक उपघटकांमध्ये शेतकरी गट, फेडरेशन अशी लोक संघटन व लोक सहभाग मिळविण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थांना सहभागी करुन घेतले जाणार आहे. या सेवा पुरवठादार संस्थांच्या कामावर योग्य प्रकारे पर्यवेक्षण करुन विहीत समाज घटकांचा सहभाग घेतला जात असल्याची खात्री करावी व त्यादृष्टीने त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे.
- उपप्रकल्पांतर्गत संपूर्ण प्रकल्प प्रस्ताव (FPP) सादर करताना पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखड्यातील कार्यपध्दती व उपाययोजनांबाबतची आवश्यक ती दक्षता घेतली असल्याची खात्री क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करावी. तसेच संपूर्ण प्रकल्प प्रस्तावांसोबत विहीत नमुण्यातील ES - १ ते ES- ५ या प्रपत्रांचा अंतर्भाव केला असल्याची खात्री करावी.
- प्रकल्पांतर्गत समाविष्ट होणाऱ्या व नव्याने स्थापन होणाऱ्या संस्थांमध्ये काही समस्या निर्माण झाल्यास त्या सोडविण्याच्या दृष्टीने समस्या निवारण यंत्रणा सुचविली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.
- प्रकल्पांतर्गत सर्व उपक्रमांचे/ कार्यक्रमांचे अंतर्गत व बाह्य संनियंत्रण व मुल्यमापन नियमीतपणे होणार आहे. याबरोबरच पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखड्यातील उपाययोजनांनुसार कार्यवाही झाली का तसेच याअंतर्गत विविध उपक्रमांचेही मुल्यमापन होणार आहे. त्यामुळे पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखड्यातील कार्यक्रम व उपाययोजना यांचा विचार होऊन त्यानुसार कार्यवाही करावी म्हणजे मुल्यमापनामध्ये सकारात्मक माहीती प्राप्त होईल.

**४. संस्थात्मक व्यवस्थाः**

पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापनाचे दृष्टीने आराखड्यानुसार आवश्यक सर्व उपाययोजना करण्याची जबाबदारी प्रकल्प समन्वय कक्षाची असेल. प्रकल्प समन्वय कक्षामध्ये पर्यावरण व सामाजिक विभागाची (ESC) स्थापना करण्यात आली असुन त्यामध्ये कार्यरत असलेले पर्यावरण तज्ञ व समाज विकास तज्ञ प्रकल्प अंमलबजावणी कक्षांशी योग्य समन्वय ठेऊन काम करीत आहेत. प्रकल्पांतर्गत कृषी, कृषी पणन व पशुसंवर्धन हे तीन कक्ष स्थापन करण्यात आले असुन या तीन कक्षांमध्ये अन्य तांत्रिक व प्रशासकिय कर्मचाऱ्यांसह पर्यावरण व सामाजिक विषयाशी निगडीत काम करण्याची जबाबदारी विशिष्ट अधिकाऱ्याकडे देण्यात आलेली आहे. हे अधिकारी उप प्रकल्प स्तरावर पर्यावरण संवर्धन व सामाजिक समायोजनाबाबत जबाबदार आहेत.

*****